Vidya Vikas Mandal's
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

विद्या विकास मंडळाचे,
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**

ESTD 1971

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

NAAC Re-Accredited with "A Grade" (CGPA 3.03) 3rd Cycle ◆◆ ISO 9001:2015 CERTIFIED ◆◆ AISHE ID : C - 8825 ◆◆ College Code : 210026

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@gmail.com | Ph : 02568-242323

# Academic Year 2022-23

## 7.2 Best Practices

**पुण्यनगरी**

# त्यागपूर्ण जीवनातून गोजरताईंनी समाजापुढे प्रेरणादायी वसा निर्माण केला - डॉ.तोरवणे

### महिलांनी शारीरिक, मानसिक आरोग्य सुदृढ ठेवावे- डॉ. डि.एल.तोरवणे



**साक्री** : आधुनिक काळात उपलब्ध असलेल्या विविध संधींना अवगत करण्यासाठी महिलांनी नेहमी तत्पर राहावे. यासाठी शारीरिक व मानसिक आरोग्य सुद्दढ ठेवावे. दैनंदिन आहार व व्यायाम यांचा समतोल राखत आरोग्याची काळजी घ्यावी, असे मत डॉ. शितल नांद्रे यांनी व्यक्त केले. 'महिला आरोग्य,समस्या व उपाययोजना' या विषयावर मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. तर त्यागपुर्ण जीवनातून गोजरताईंनी समाजापुढे प्रेरणादायी वसा निर्माण केला, असे मत डॉ. डि.एल.तोरवणे यांनी अध्यक्षीय भाषणात बोलतांना व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे माजी आ. कै. गोजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच युवती सभेच्या अंतर्गत आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे होते. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ. श्रुतिका मढावी, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील यावेळी उपस्थित होते. यानिमित्त डॉ. शितल नांद्रे यांनी 'महिला आरोग्य,समस्या व उपाययोजना' या विषयावर मार्गदर्शन देखील केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. डी. एल. तोरवणे यांनी यशस्वी व त्यागपूर्ण जीवन जगत कै.गोजरताईंनी समाजापुढे प्रेरणादायी वसा उभा केला आहे. त्यांच्या या कार्याला व विचारांना उतराई होत प्रत्येक विद्यार्थ्याने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपले जीवन व्यतीत करावे, असे मत व्यक्त केले. मुलींच्या शिक्षणासाठी कै गोजरताई भामरे यांनी विशेष पुढाकार घेऊन आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी शिक्षणाची गंगोत्री कै. दादासो रामराव पाटील यांच्या नेतृत्वात निर्माण केली असे देखील मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी केले. डॉ श्रुतिका मढावी यांनी रक्तदानाचे महत्व पटवून देत माहिती दिली. कै. गोजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागामार्फत तीन व पाच किलोमीटर धावणे या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात पुरुष गटात अजय चव्हाण, हर्षवर्धन भदाणे, गौरव कलाल तर महिला वर्गात गायत्री साळुंखे, गायत्री सूर्यवंशी व पूजा मोरे ह्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविला. दर वर्षाप्रमाणे घेण्यात आलेल्या रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण २५ जणांनी रक्तदान केले तर १३५ विद्यार्थ्यांनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी रक्तगट तपासणी करून घेतली.

कार्यक्रमाचे संचालन डॉ प्रकाश साळुंखे यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. हसीनखा तडवी, युवती सभेच्या प्रमुख डॉ. ज्योती वाकोडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ. भूषण आहिरराव, रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्र सिंग मगर यांनी प्रयत्न केले.

**Smart Dhule**
Page No.4 August 31, 2022

**News regarding organization of Blood Group Detection Camp and Blood Donation Camp as well as various activities**

Vidya Vikas Mandal's
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College,**
**Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

ESTD 1971

विद्या विकास मंडळाचे,
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**


Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

NAAC Re-Accredited with "A Grade" (CGPA 3.03) 3rd Cycle ◆ ISO 9001:2015 CERTIFIED ◆ AISHE ID : C - 8825 ◆ College Code : 210026

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@gmail.com | Ph : 02568-242323

# Academic Year 2022-23

## 7.2 Best Practices



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
श्री. भाऊसाहेब हिरे
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे
रक्तपेढी विभाग
॥ प्रमाणपत्र ॥

दि. 28/11/२०22

प्रति, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभाग
सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री, (धुळे.)
आपण रक्तदान शिबीराचे आयोजन केल्याबद्दल
राज्य रक्त संक्रमण परिषद व रक्तपेढी सर्वोपचार रुग्णालय, धुळे
यांच्या वतीने मनपूर्वक आभार !

रक्तसंक्रमण अधिकारी
रक्तपेढी, सर्वोपचार रुग्णालय, धुळे

अधिष्ठाता
रक्तपेढी, सर्वोपचार रुग्णालय, धुळे

रक्तदान एक पुण्य कर्म

**Blood Donation Camp Appreciation Letter by Civil Hospital Dhule**

## Academic Year 2022-23

## 7.2 Best Practices




साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांची ओळख या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना व्ही. के. बोलसोरे.

# साक्री महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेवर कार्यशाळा

**▸सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. २३ : विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून त्यानुसार ध्येय ठरवून या ध्येयाप्रति सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास स्पर्धा परीक्षेतील यश हमखास साध्य करता येईल, असा विश्वास धुळे येथील युनिक ॲकॅडमीचे व्ही. के. बोलसोरे यांनी व्यक्त केला.

विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्र तसेच पुणे येथील द युनिक ॲकॅडमी धुळे शाखा यांच्यातर्फे झालेल्या कार्यशाळेत 'स्पर्धा परीक्षांची ओळख' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते.

समारोपात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी योग्य नियोजनाच्या आधारे ईप्सित साध्य करणे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयात चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून विविध उपक्रम घेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत साक्षर केले जात असल्याचे मतदेखील त्यांनी व्यक्त केले. दर रविवारी पदाधिकाऱ्यांचे व्याख्यान, विविध स्पर्धा परीक्षांवर आधारित चाचणी, प्रश्नमंजूषा इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची ओळख करून देण्याचे कार्य या केंद्राच्या माध्यमातून होत असल्याचेदेखील त्यांनी नमूद केले. चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक डॉ. प्रीतम तोरवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पंकज अहिरे, डॉ. चंद्रकांत कढरे, चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रा. योगेश आहेर, प्रा. संदीप कदम, प्रा. मुकेश वळवी, स्वप्नील देवरे, गौतम बच्छाव उपस्थित होते.

**Chanakya Competitive Examinations Guidance Centre Initiatives**

# Academic Year 2022-23

## 7.2 Best Practices

# सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास स्पर्धा परीक्षेतील यश निश्चित :प्रा. बोलसोरे




➩ साक्री । (खान्देश मैदान वृत्त) : विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून त्यानुसार ध्येय ठरवून या ध्येयप्रती सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास स्पर्धा परीक्षेतील यश निश्चितपणे साध्य करता येईल, असे मत युनिक अकॅडमी धुळेचे व्ही. के. बोलसोरे यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्रीचे चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्र तसेच द युनिक अकॅडमी, पुणे शाखा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत स्पर्धा परीक्षांची ओळख या विषयावर ते बोलत होते. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र अहिरे होते. बीलसोरे यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी याची माहिती देत असताना स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षेतील विविध पदे व ती निवडीची पद्धती याविषयी देखील सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी योग्य नियोजनाच्या आधारे इप्सित साध्य करणे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयात चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून विविध उपक्रम घेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत साक्षर केले जात असल्याचे मतदेखील त्यांनी व्यक्त केले. दर रविवारी पदाधिकाऱ्यांचे व्याख्यान, विविध स्पर्धा परीक्षांवर आधारित चाचणी, प्रश्नमंजुषा इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची ओळख करून देण्याचे कार्य या केंद्राच्या माध्यमातून होत असल्याचेदेखील त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक डॉ. प्रीतम तोरवणे यांनी केले. प्रसंगी डॉ. पंकज अहिरे, डॉ. चंद्रकांत कढरे, चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रा. योगेश आहेर, प्रा. संदीप कदम, प्रा. मुकेश वळवी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वप्निल देवरे, गौतम बच्छाव यांनी परिश्रम घेतले.

**Chanakya Competitive Examinations Guidance Centre Initiatives**

# Academic Year 2022-23

## 7.2 Best Practices




G K Quiz

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

श्री. भाऊसाहेब हिरे

## शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे

# रक्तपेढी विभाग

# ॥ प्रमाणपत्र ॥

दि. 28/11/२022

प्रति, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विभाग
सी. गो. पाटील महाविद्यालय साक्री, (धुळे.)

आपण रक्तदान शिबीराचे आयोजन केल्याबद्दल

राज्य रक्त संक्रमण परिषद व रक्तपेढी सर्वोपचार रुग्णालय, धुळे

यांच्या वतीने मनपूर्वक आभार !

**रक्तसंक्रमण अधिकारी**
रक्तपेढी, सर्वोपचार रुग्णालय, धुळे

**अधिष्ठाता**
रक्तपेढी, सर्वोपचार रुग्णालय, धुळे

रक्तदान एक पुण्य कर्म

सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड

(रक्तकेंद्रा बाबत माहिती)

रक्तकेंद्राचे नाव व पत्ता : BLOOD BANK DHULE S.B.H.G.M.C.& Dhule

175480

Unique I.D.No.:

रक्तकेंद्र दूरध्वनी क्र. :

पी.आर.ओ. :

रक्तदाता माहिती

रक्तदात्याचे नाव : ज्योतिराम भैरवनाथ सुरवाडे

रक्तदाता स्त्री / पुरुष :

पत्ता : साक्री

दूरध्वनी क्र.(रक्तदाता) :

रक्तगट : B+ve

रक्त पिशवी क्र.: 6433

रक्तदान केल्याचे दिनांक : 28 NOV 2022

शिबीर आयोजकाचे नाव :

रक्त संक्रमण अधिकारी

सत्यमेव जयते

# रक्त संक्रमण परिषद

## महाराष्ट्र राज्य

BLOOD BANK DHULE S.B.H.G.M.C.& Dhule 6433

## प्रमाणपत्र

कु./श्री./श्रीमती ज्योतिराम भैरवनाथ साखुडे सुरवाडे

यांनी दिनांक 28 NOV 2022 रोजी साक्री जि धुळे या ठिकाणी

स्वेच्छेने रक्तदान केल्याच्या सन्मानार्थ, त्यांना राज्य रक्त संक्रमण परिषदेतर्फे हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

SBTC

महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद

State Blood Transfusion Council

B.T.O.

सक्षम अधिकारी

शा.फो.झि.मु.,पुणे-पी/९५(५,००,००० पाच लक्ष प्रती)-८-२०१९

**सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड**
(रक्तपेढी बाबत माहिती)

रक्तपेढीचे नाव व पत्ता : ____________________

BLOOD BANK DHULE S.B.H.G.M.C. & Dhule

Unique I.D. No.

रक्तपेढी दूरध्वनी क्र. : ____________________

पी.आर.ओ. ____________________

**रक्तदाता माहिती**

रक्तदात्याचे नाव : विशाल काशिनाथ भिल

रक्तदाता : स्त्री / पुरुष

पत्ता : साक्री

रक्तगट : B+

रक्तपिशवी क्र. : 6449

रक्तदान केल्याचे दिनांक : 28 NOV 2022

शिबीर आयोजकाचे नाव : ____________________

दूरध्वनी क्र. (रक्तदाता) : ____________________

रक्त संक्रमण अधिकारी

सत्यमेव जयते

# ...क्त संक्रमण परिषद

## महाराष्ट्र राज्य

BLOOD BANK DHULE 6449 S.B.H.G.M.C. & Dhule

## प्रमाणपत्र

कु./श्री./श्रीमती विशाल काशिनाथ भिल

यांनी दिनांक 28 NOV 2022 रोजी साक्री जि. धुळे या ठिकाणी

स्वेच्छेने रक्तदान केल्याच्या सन्मानार्थ, त्यांना राज्य रक्त संक्रमण परिषदेतर्फे हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

SBTC
महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद
State Blood Transfusion Council

सक्षम अधिकारी

शा.फो.झि.मु.,पुणे-पी/९५(५,००,००० पाच लक्ष प्रती)-८-२०१९